# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद सदस्यांच्या स्वीय सहायकांना डिजीटल ओळखपत्र पुरविणे...

१५ व्या विधानसभेत निवडून आलेल्या विधानसभा सदस्यांच्या स्वीय सहायकांना तसेच विधानपरिषद सदस्यांच्या स्वीय सहायकांना डिजीटल ओळखपत्र पुरविण्याकरिता या क्षेत्रातील पुरवठदार/ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांच्या स्वीय सहायकांना ओळखपत्र तयार करुन घ्यावयाची आहेत. सदर ओळखपत्राच्या पृष्ठ भागावर विधान भवन इमारतीचे रंगीत छायाचित्र व थ्री-डी होलोग्राम स्टिकर तसेच मागील बाजूस महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय कार्यालयाच्या सूचना मुद्रीत करुन प्लॅस्टिक कोटींगसहित मेटालिक फ्रेम तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय सदस्यांचे स्वीय सहायक लिहलेली हिरव्या रंगाची रीबीन व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय सदस्यांचे स्वीय सहायक लिहलेली लाल रंगाची रीबीन सह ओळखपत्र तयार करण्यासाठी मुद्रण-छपाई क्षेत्रातील अनुभव असलेल्या अग्रगण्य संस्थाकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर काम करण्यास इच्छुक असलेल्या या क्षेत्रातील अग्रगण्य अशा संस्था यांनी त्यांचे नाव व पत्ता, मूल्यवर्धीत कर नोंदणी क्रमांक, सेवाकर नोंदणी क्रमांक, अन्य शासकीय/निमशासकीय तसेच खाजगी कार्यालयाकरिता ओळखपत्र तयार करुन पुरवठा केल्याबाबतची माहिती तसेच आपण केंद्र/राज्य शासनाच्या दर करारावर मान्यताप्राप्त आहेत किंवा कसे याबाबतची माहिती व कामाचे दर नमूद केलेली निविदा मोहरबंद लिफाफ्यातून सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई- ४०००३२ या पत्त्यावर दिनांक ०५ ऑगस्ट, २०२५ पूर्वी किंवा त्यादिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावी.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणास कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

**सचिव-४**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**